# महाराष्ट्र शासन

## आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय

जुने जकात घर दुसरा मजला, शहीद भगत सिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१
ईमेल आयडी- directorevsed@gmail.com दूरध्वनी क्र.०२२ २२६६१९८७

विषय :- मोबाईल ॲपचा वापर करुन
परिवहन पास वरील QR Code
स्कॅन करुन पडताळणी करणेबाबत.

**परिपत्रक**

क्रमांक : डिईटी११२०२१/अं. व द./QR Code scan/नऊ मुंबई, दि.१६/०४/२०२१.

राज्यातील मद्य,मद्यार्क व मळी निर्मिती घटकातून तसेच घाऊक विक्रेते यांचे कडून उक्त पदार्थांची वाहतूक परिवहन पासद्वारे करण्यात येते. सदर मद्य, मद्यार्क व मळीची वाहतूक परिवहन पासद्वारे होत असताना राज्यातील कार्यकारी व भरारी पथकातील तसेच पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांना सदर मद्य,मद्यार्क व मळी ही अधिकृत आहे किंवा कसे ? याची पडताळणी करणे सोईस्कर व्हावे तसेच सदर परिवहन पासचा गैर वापर होऊ नये म्हणून सप्लाय चेन मॅनेजमेंट (SCM ) प्रणालीमधून निर्गमित होणाऱ्या परिवहन पासवर QR Code छापलेला असतो. सदर QR Code वाचण्याकरिता मोबाईल ॲप विकसीत करण्यात आलेला आहे.

सदरील मोबाईल ॲपमुळे सीमा तपासणी नाक्यावरील अधिकाऱ्यांना तसेच कार्यकारी व भरारी पथकातील अधिकाऱ्यांना राज्यातील मद्य, मद्यार्क व मळी वाहतूकीची पडताळणी परिवहन पास वरील QR Code Scan केल्यानंतर प्राप्त होईल. त्याअन्वये किती परिमाणाचे मद्य, मद्यार्क व मळी आहे व प्रत्यक्षात किती आढळून आले हे तपासता येईल. तसेच परिवहन पास वरील मद्य घाऊक व किरकोळ विक्रेत्याने स्विकारले असेल तर त्या परिवहन पासवर दुसऱ्यांदा मद्याची वाहतूक होत असल्यास, परिवहन पासवरील QR Code मोबाईल ॲपद्वारे स्कॅन केल्यास TP Valid असे दिसेल, परंतु त्यामध्ये असे दिसेल की, सदर TP घाऊक / किरकोळ विक्रेत्याने स्विकारली असून त्याची तारीख व सदर परिवहन पासची मुदत संपल्याचे निदर्शनास येईल. सबब, परिवहन पासचा पुर्न:वापर करून उक्त पदार्थाची वाहतूक बेकायदेशीरपणे होत असल्याचे निदर्शनास येईल. यावरून अधिकाऱ्यांना एका परिवहन पासचा वापर दुसऱ्यांदा होत आहे, ही बाब त्वरीत लक्षात येईल व संबंधीत वाहनावर/घटकावर कारवाई करणे सोईचे होईल.

मोबाईल ॲपचा वापर करताना खालील पध्दतीचा अवलंब करावा.

१) विभागीय उप आयुक्तांनी व अधीक्षकांनी प्रथम https://scmexcise.mahaonline.gov.in/qrcode या संकेतस्थळावर जाऊन त्यांना SCM बाबत देण्यात आलेले User Crendetials चा वापर करून होम पेज ओपन करावे तद्नंतर Add new staff details येथे जाऊन त्यांच्या अधिपत्याखालील जवान संवर्ग ते अधीक्षक यांची माहिती व मोबाईल नंबर भरावेत. तद्नंतर अधिकारी व जवान संवर्गीय कर्मचारी यांना मोबाईल ॲप डाऊनलोड करण्याचे

२) Play Store वर जाऊन MH Excise TP Scan हे ॲप डाऊनलोड करावे व स्वत:चा मोबाईल नंबर रजिस्टर करावा.

३) परिवहन पास तपासताना परिवहन पासावरील QR Code मोबाईल ॲपमधील SCAN QR CODE येथे क्लीक करुन QR Code स्कॅन करावा. अथवा SEARCH QR CODE वर क्लीक करुन सिस्टिम जनरेटेड परिवहन पास क्रमांक टाईप करुन SEARCH TP वर क्लीक करावे.

४) QR Code स्कॅन केल्यानंतर TP is Valid असा मॅसेज दिसेल व त्याखाली घाऊक विक्रेत्याने TP स्विकारलेली आहे का ? व कोणत्या तारखेला स्विकारली ? हे दिसेल. तसेच TP Validity संपली असल्यास TP Validity has expired असे दिसेल. त्या खाली सदर परिवहन पास मध्ये एकूण किती बॉक्स (Case) आहेत. हे दिसून येईल. तद्नंतर VIEW TP DETAILS क्लीक करावे.

५) VIEW TP DETAILS क्लीक केल्यानंतर संबंधीतांकडील परिवहन पासावरील सर्व माहिती येईल व प्रत्यक्ष तपासणी करता येईल.

६) सदरील परिवहन पासवर व प्रत्यक्ष साठा यामध्ये काही तफावत आढळल्यास चौकशीअंती कारवाई करता येईल

७) काही अनुज्ञप्तीधारक / अवैध धंदे करणारे इसम बनावट परिवहन पासचा वापर करतील त्यावेळी सदरील परिवहन पासवरील QR Code स्कॅन केल्यानंतर TP Invalid असा मॅसेज येईल.. अशा वेळी संबंधीतांविरुध्द कायदया नुसार कार्यवाही करावी.

या परिपत्रकातील सर्व बाबींची माहिती अधीक्षकांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यकारी व अकार्यकारी / पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांच्या तसेच जवान संवर्गीय कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून दयावी.

(कांतीलाल उमाप)
आयुक्त राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

१. आयुक्त कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी
२. सर्व विभागीय उप-आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
३. सर्व अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क,
४. सर्व निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क,
५. सर्व दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क,
६. या कार्यालयातील कार्यासन क्रमांक १२ (५ प्रती) / अभीलेख शाखा.